दिनांक 13/03/2024 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र.292

विषय – विटा नगरपरिषद हद्दीमध्ये भाजी मंडई सोडून इतरत्र ठिकाणी बसणा-या भाजी विक्रेत्यांना बाजार कर वसुलीच्या तिप्पट दंड वसुल करून मंडईमध्ये बसणेस प्रवृत्त करण्यासाठी उपाययोजना करणेबाबत निर्णय घेणे.

संदर्भ- मा.मुख्याधिकारी यांनी विभाग प्रमुख यांची दिनांक 12/03/2024 रोजी मंजूर केलेली टिपणी.

विटा नगरपरिषदेने नवीन भाजी मंडई येथे अद्ययावत कट्टे व शेड उभारून सर्व सोईसुविधायुक्त भाजी मंडई तयार करणेत आली आहे. परंतु काही भाजीपाला विक्रेते चौंडेश्वरी चौक, गांधी चौक, विटा हायस्कूल समोर, विटा अर्बन बँकेसमोर बसत आहेत. त्यामुळे या परिसरामध्ये वाहतुकीस अडथळा येऊन अपघात होण्याची शक्यता नाकाराता येत नाही. तसेच काही भाजी विक्रते हे मंडईतील कट्टयावर न बसता बाहेर बसत आहेत. सदर भाजी विक्रेत्यांना बाजार कर वसुलीच्या तिप्पट दंड वसुल केलेस सदर भाजी विक्रेते हे भाजी मंडईमध्ये बसतील. त्यामुळे सदर बाहेर बसणा-या भाजी विक्रेत्यांना मंडईमध्ये बसणेस प्रवृत्त करण्यासाठी मदत होईल.

तरी विटा नगरपरिषद हद्दीमध्ये भाजी मंडई सोडून इतरत्र ठिकाणी बसणा-या भाजी विक्रेत्यांना बाजार कर वसुलीच्या तिप्पट दंड वसुल करणेस मंजूरी देत आहे. तसेच भांजी विक्रेत्यांना भांजी मंडईमध्ये बसणेस प्रवृत्त करणेत यावे.

सही/-
( डॉ.विक्रम बांदल )
प्रशासक
विटा नगरपरिषद विटा

दिनांक 13/03/2024 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र.293

विषय – विटा नगपरिषद प्रशासकीय ठराव क्रं.172 दिनांक 10/11/2023 ने मंजूर केलेल्या जाहिरात धोरणमध्ये अंशत: बदल करणेबाबत निर्णय घेणे.

संदर्भ- मा.मुख्याधिकारी यांनी विभाग प्रमुख यांची दिनांक 12/03/2024 रोजी मंजूर केलेली टिपणी.

शासनाच्या नवीन जाहिरात धोरणानुसार विटा नगरपरिषदेने प्रशासकीय ठराव क्रमांक 172 दिनांक 10.11.2023 ने जाहीरात धोरण प्रसिध्द केले होते. सदर जाहीरात धोरणाची वर्तमानपत्राव्दारे तसेच शहरात बोर्ड लावून व्यापक प्रसिध्दी करणेत आली होती व याव्दारे विनापरवाना जाहीरात लावलेल्या आस्थापनांना परवानगीसाठी अर्ज करणेबाबत कळविले होते.

विटा नगरपरिषद हद्दीतील जाहिरात प्रदर्शित करण्याचे नियमन व नियंत्रण करण्यासाठी प्रशासकीय ठराव नं.199 दिनांक 12.12.2023 ने शहरातील नियंत्रण समिती स्थापन करण्यात आली. यासाठी नगरपरिषदेकडून संबंधित आस्थापनांचा सर्व्हे करणे कामी टीम तयार करून नवीन जाहीरात धोरणातील जाहीरातीच्या दरानुसार जाहीरातीची रक्कम निश्चित करून सर्व आस्थापनांना कळविण्यात आली होती. परंतु बहुतांशी आस्थापना धारक यांनी सदर कराची रक्कम व कराचे दर जास्त असून ते कमी करण्याबाबत लेखी अर्जाव्दारे विनंती केली आहे. तसेच काही आस्थापनांनी सदर कराची रक्कम जास्त असलेने त्यांनी लावलेले जाहीरातीचे बार्ड / बॅनर काढून घेत आसलेबाबत कळविले आहे. तरी नवीन जाहिरातीचे सध्याचे दर ठेवल्यास जाहिरात कर वसूल होणार नाही व त्याची डिमांड तशीच राहून जाहिरात धोरणाचा हेतू साध्य होणार नाही. नागरीकांच्या मागणीनुसार सध्याच्या जाहीरात कराच्या दरात अंशत: बदल करणे (कमी करणे) आवश्यक वाटते. यामुळे जाहीरात कराची वसुली वेगाने होण्यास मदत होईल व त्यामुळे जाहीरात धोरणाचा मुळ उद्देश साध्य होण्यास मदत होईल.

त्यानुसार मुळ जाहिरात धोरणात खालील प्रमाणे अंशत: बदल करण्यात येत आहेत

जाहिरात परवाना फी- र.रू.1,000/-

विना परवाना /परवानगी जाहिरात प्रदर्शित केलेस दंड- जाहिरात निहाय नमूद दराच्या 3 पट दंड (खाली नमूद 1 ते 23 जाहिरात प्रकारापैकी कोणतीही जाहिरात विना परवाना/परवानगी लावलेस दंड)

| अं.क्रं. | जाहिरातीचा प्रकार | तपशील | नवीन दर |
|---|---|---|---|
| 1 | आकाश चिन्ह (स्काय-साईन)प्रकाशित जाहिरात | आकाश चिन्ह किंवा ज्याचा कोणताही भाग रस्त्यातील कोणत्याही ठिकाणापासून आकाशात दिसू शकतो आकाश चिन्ह | प्रति चौ.फुट रक्कम रू.100/- (वार्षिक) +इतर शासकीय कर |

पान नं.2 वर

| | | | |
|---|---|---|---|
| 2 | आकाश चिन्ह (स्काय-साईन) अप्रकाशित जाहिरात | आकाश चिन्ह किंवा ज्याचा कोणताही भाग रस्त्यातील कोणत्याही ठिकाणापासून आकाशात दिसू शकतो ते आकाश चिन्ह असा आहे | प्रति चौ.फुट रक्कम रू.75/- (वार्षिक) +इतर शासकीय कर |
| 3 | इलेक्ट्रॉनिक्स डिस्प्ले (खाजगी) | एखादया संरचनेवर बसविलेला, इलेक्ट्रॉनिक्सरित्या प्रवर्तित होणारा जाहिरात डिस्प्ले हा निऑन दिवे, एल.ई.डी.किंवा एलसीडी यांसारखे इलेक्ट्रॉनिक्स किंवा विदयुत साधन | प्रति चौ.फुट रक्कम रू.100/- (वार्षिक) +इतर शासकीय कर |
| 4 | इेलेक्ट्रॉनिक्स डिस्प्ले (व्यवसायिक ) | एखादया संरचनेवर बसविलेला, इलेक्ट्रॉनिक्सरित्या प्रवर्तित होणारा जाहिरात डिस्प्ले हा निऑन दिवे, एल.ई.डी.किंवा एलसीडी यांसारखे इलेक्ट्रॉनिक्स किंवा विदयुत साधन | प्रति चौ.फुट रक्कम रू.50/- (मासिक) व अनामत र.रू.10,000/- + इतर शासकीय कर |
| 5 | जाहिरात होर्डींग (खाजगी)(फिक्स/पर्मनंट) | 10 फुट x 20 फुट,20 फुटx10 फुट, 20 फुटx20 फुट, 30 फुटx15 फुट, 30 फुटx20 फुट | प्रति चौ.फुट रक्कम रू.4/- प्रति महिना + इतर शासकीय कर |
| 6 | जाहिरात होर्डींग (व्यवसायिक) (फिक्स/पर्मनंट) | 10 फुट x 20 फुट, 20 फुट x 10 फुट, 20 फुट x 20 फुट, 30 फुट x 15 फुट, 30 फुट x 20 फुट | प्रति चौ.फुट रक्कम रू.5/- प्रति महिना व आनामत र.रू.5,000/- +इतर शासकीय कर |
| 7 | जाहिरात होर्डींग (खाजगी) विनापरवाना(फिक्स/पर्मनंट) | 10 फुट x 20 फुट, 20 फुट x 10 फुट, 20 फुट x 20 फुट, 30 फुट x 15 फुट, 30 फुट x 20 फुट | प्रति चौ.फुट रक्कम प्रति 7/- + इतर शासकीय कर |
| 8 | निर्देश फलक | खाजगी वा वाणिज्यिक आस्थापनेने आपल्या कार्यालयांचा किंवा वाणिज्यिक आस्थापनेची दिशा सुचित करण्यासाठी उभारलेला फलक असा आहे(दुकानावरील 1 बोर्ड वगळता ) | प्रति चौ.फुट रक्कम प्रति 50/-(वार्षिक)+ इतर शासकीय कर |

पान नं.3 वर

| | | | |
|---|---|---|---|
| 9 | निशाण (बॅनर)/जाहिरात फ्लेक्स (तात्पुरते)(लांबीx रूंदी)(खाजगी/सार्वजनिक जागा) | ज्यामध्ये जाहिरातीचा किंवा घोषणेचा किंवा लिखीत मजकुराचा समावेश आहे असे सार्वजिक/खाजगी ठिकाणी प्रदर्शित करण्यासाठी असलेल्या कापड किंवा इतर कोणतेही साहित्य असा आहे.सण, उत्सव, स्वागत समारंभ, जयंती इ.साठी जास्तीत जास्त तीन दिवस बॅनर लावता येतील. | प्रति दिन रू.50/-(तीन दिवसाकरिता) मुदतीनंतर स्वताहून काढून घेणे आवश्यक+इतर शासकीय कर |
| 10 | निशाण (बॅनर)/जाहिरात फ्लेक्स (तात्पुरते)(लांबीx रूंदी)(खाजगी/सार्वजनिक जागा) | ज्यामध्ये जाहिरातीचा किंवा घोषणेचा किंवा लिखीत मजकुराचा समावेश आहे असे सार्वजिक / खाजगी ठिकाणी प्रदर्शित करण्यासाठी असलेल्या कापड किंवा इतर कोणतेही साहित्य असा आहे.सण, उत्सव, स्वागत समारंभ, जयंती इ.साठी जास्तीत जास्त तीन दिवस बॅनर लावता येतील.<br>5 फुट x5 फुट ते 10फुट x 10 फुट पेक्षा कमी | प्रति दिन रू.200/-(तीन दिवसाकरिता ) मुदतीनंतर स्वताहून काढून घेणे आवश्यक+इतर शासकीय कर |
| 11 | ग्लो साईन बॉक्स जाहिरात (BACK LIGHT) | धातुच्या पत्राच्या पुढील बाजूस कोणतेही पारदर्शक, अर्धपारदर्शक पडदा बसवून, तिच्या मागील बाजूकडून विदयुत दिव्यांचा उपयोग करून प्रदर्शित केलेला जाहिरात, असा आहे | प्रति चौ फुट रक्कम रू.100/- (वार्षिक)+ इकर शासकीय कर |
| 12 | तात्पुरत्या कमानी उभारणे | समांरभ, कार्यक्रम व इतर करता तात्पुरत्या कमानी ठराविक दिवसा करिता उभारणे. | प्रति दिन रू.500/- प्रति नग |
| 13 | तात्पुरता मंडप उभारणे | समांरभ, कार्यक्रम व इतर करता तात्पुरता मंडप ठराविक दिवसा करिता उभारणे. | प्रति दिन रू.500/- प्रति नग |

पान नं.4 वर

| | | | |
|---|---|---|---|
| 14 | एअर बलून स्टॅच्यु | | र.रू.20.00+टॅक्स प्रति नग प्रति दिवस |
| 15 | एअर बलून | | र.रू.30.00+टॅक्स प्रति नग प्रति दिवस |
| 16 | फिरते जाहिरात डिस्प्ले | वाहनावर किंवा वाहनाच्या पाठीमागे बसविलेल्या एक किंवा दोन दर्शनी बाजुंचा जाहिरात फलक (होर्डींग) किंवा दर्शक पाटल (पॅनल) असा असून, ते वाहन अशा रितीने जाहिरात अधिक चांगल्या प्रकारे प्रदर्शित करण्यासाठी मोक्याच्या ठिकाणच्या आसपास चालविता येते किंवा ते उभे करता येते | प्रति चौ.फुट रक्कम रू.50/- प्रति दिन + इतर शासकीय कर |
| 17 | भिंत/रस्त्यातील लिखाण | विटा नगपरिषदेच्या सामाजिक व शासकीय कामा व्यतिरिक्त इतरांना परवानगी नाही | शास्ती फी 2,000/- रू आणि मालमत्ता विद्रुपण कायदा 1995 नुसार कारवाई+ इतर शासकीय कर |
| 18 | टूर आणि ट्रॅव्हल्ससाठी व्यवसाय नाहरकत प्रमाणपत्र | नाहरकत प्रमाणपत्र | रक्कम रूपये 1,000/- (वार्षिक)+ इतर शासकीय कर |
| 19 | सायकल वरील जाहिरात | सायकल वरील प्रसिध्द करायच्या जाहिराती | प्रति दिन, प्रति सायकल 100/- रू इतर + इतर शासकीय कर |
| 20 | वृक्ष संरक्षण जाळयावरील जाहिरात | विटा नगरपरिषदेच्या हद्दीतील वृक्षांना जाळी देणगीदाराने बसविल्यास त्याचे नावाची मोफत जाहिरात मा.मुख्याधिकरी यांच्या मान्यतेने व अटीने प्रदर्शित करता येईल व या व्यतिरिक्त ज्यांच्या नावाची जाहिरात वृक्ष जाळीवर करावयाची आहे त्यांना | रक्कत रू.50/- (वार्षिक) प्रति वृक्ष जाळी+ इतर शासकीय कर |
| 21 | किऑक्स/T-CANTILE | खांबाच्या एका किंवा दोन्ही बाजूस प्रदर्शित केलेली जाहिरात | रक्कम रू.5/- (प्रति दिवस)प्रति किऑक्स, प्रति बाजू+ इतर शासकीय कर |

पान नं.5 वर

| | | | |
|---|---|---|---|
| 22 | रोड शो रस्त्यावर / चौकात / मोकळया जागेत | | (1)सिनेमा चित्रीकरण करण्याकरिता 3,000/- रू प्रति दिन + इतर शासकीय कर. (2)व्यवसायिक कामाकरिता 2,000/- प्रतिदिन + इतर शासकीय कर (3)सामाजिक संदेश करिता मुख्याधिकारी यांच्या पूर्व मान्यतेने – मोफत |
| 23 | लेखपट्टक दर्शी (स्क्रोराल डिस्प्ले ) | याचा अर्थ जाहिरात प्रदर्शित करणा-या दर्शक पटलावर मुद्रित पात अखंडीतपणे आवर्तन पध्दतीने फिरण्यासाठी काळ बसविलेल्या पेटीच्या आकारातील दर्शक पटल असा आहे मग ती प्रकाश योजना असलेली किंवा नसलेली असेल | रक्कम रू.5,000/- फिरणा-या प्रति स्क्रोराल डिस्प्ले (वार्षिक) + इतर शासकीय कर |

तरी विटा नगपरिषद प्रशासकीय ठराव क्रं.172 दिनांक 10/11/2023 ने मंजूर केलेल्या जाहिरात धोरणमध्ये वरील प्रमाणे अंशत: बदल करणेस (कमी करणेस)मंजूरी देत आहे. तसेच यापुर्वीच्या जाहिरात धोरणानुसार जाहिरात कर आकारणी करून दिलेल्या नोटीसा अधिक्रमित करून नविन नोटीसा नविन दराप्रमाणे देणेत याव्यात. याकामी पुढील आवश्यक ती नियमबध्द कार्यवाही करणेत यावी.

सही/-
( डॉ.विक्रम बांदल )
प्रशासक
विटा नगरपरिषद विटा

दिनांक 13/03/2024 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र.294

विषय – विटा नगरपरिषद हद्दीतील मालमत्तांचे (जमिनीवइमारती) सर्वेक्षण करून आवश्यक माहीती संकलित करणे, करमुल्यांकन व संगणक आज्ञावली व आवश्यक तांत्रिकसेवा, तांत्रिक पुरवठा व इतर अनुषांगिक कामे करणे कामी दाखल ई निविदावर निर्णय घेणे.

संदर्भ- मा.मुख्याधिकारी यांनी कर अधिक्षक यांची दिनांक 12/03/2024 रोजी मंजूर केलेली टिपणी.

विटा नगरपरिषद हद्दीतील मालमत्तांचे (जमिनी व इमारती) सर्वेक्षण करून आवश्यक माहीती संकलित करणे, करमुल्यांकन व संगणक आज्ञावली व आवश्यक तांत्रिकसेवा, तांत्रिक पुरवठा व इतर अनुषांगिक कामे करणे कामी स्थापत्य कन्सलटन्ट प्रा.लि. साईरथ अपार्टमेंट, शेगांव रोड, अमरावती, पिन नं.444601 यांचे ई निविदेमधील बाब क्रमांक 1 ते 3 साठी दिलेले दर हे वाजवी दरापेक्षा जास्त असल्याने ते नगरपरिषदेस परवडणारे नसल्याने नगरपरिषदेच्या आर्थिक फायदा विचारात घेता वाटाघाटीसाठी बोलवीले असता सोमवार दिनांक 11/03/2024 रोजी दुपारी 4.00 वाजता नगरपरिषद कार्यालयामध्ये उपस्थित होते.

त्या अनुषंगाने स्थापत्य कन्सलटन्ट प्रा. लि. साईरथ अपार्टमेंट, शेगांव रोड अमरावती, पिन नं. 444601 यांचेशी वाटाघाटी अंती पुढील प्रमाणे निश्चित केलेले दर.

| Sl.No | Particulars | Unit | Tender Rates | | Revised Rates | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | Including GST | Excluding GST | Including GST | Excluding GST |
| 01 | Property Tax Department. (Numbering, Door to door property survey, Property, Data collection for evaluation and assessment for ratable or capital value, Computerization of all collected data and link all data to software. Providing services and Carrying out all detail work mentioned in scope of work as per section 6A To 6D. | Per Property unit | Rs.900/- | Rs.763/- | Rs.883/- | Rs.748/- |

पान नं.2 वर

| SI.No | Particulars | Unit | Tender Rates ( Including GST ) | Revised Rates (Including GST) |
| --- | --- | --- | --- | --- |
| 02 | Providing Annual Operation & maintenance and Supply for the property tax dept as providing yearly tax collection postings, Bills of taxes, demand registers and collection register etc with preprinted multicolor stationary and maintaining the database, etc as per tender document scope of work for 5 Years as per section (6E-A-I to III and 6E-B-I to VI) | Per Property unit per Year | Rs.167/- | Rs.162/- |
| 03 | Providing mobile tablet devices, bluetooth printer, hardware with warranty and one year on site servise against any fault. Training and Capacity building for Municipal Staff as per section (6E-B(VII)) | Per Set of One Teb and One Bluetooth printer | Rs.59180/- | Rs.55180/- |

तरी वरील प्रमाणे वाटाघाटीअंती निश्चित केलेले दरास मंजूरी देत आहे. महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 2013 मधील तरतूदीनूसार सर्वात कमी दराची निविदा मंजूर करीत आहे. याकामी रितसर करारपत्र करून कार्यारंभ आदेश देणेत यावा. तसेच नामंजूर टेंडर बयाणा रक्कम अदा करणेस मंजूरी देत आहे.

सही/-
( डॉ.विक्रम बांदल )
प्रशासक
विटा नगरपरिषद विटा

दिनांक 13/03/2024 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र.295

विषय – लहान व मध्यम शहराची एकात्मीक शहर विकास योजनानुसार (IDSMT) विटा जि.सांगली पुर्णत्वाचा दाखला मिळणेकामी शासनाकडे प्रस्ताव सादर करणेबाबत मंजूरी देणे.

संदर्भ- मा.मुख्याधिकारी यांनी शिफ्ट इंजिनियर यांची दिनांक 13/03/2024 रोजी मंजूर केलेली टिपणी.

विटा नगरपरिषद जि. सांगली कडील मंजुर एकात्मीक शहर विकास योजनेतील सर्व घटकांचे कामे पूर्ण झालेली आहेत. सदर योजने अंतर्गत एकुण रु.106.37 लक्ष इतके अनुदान प्राप्त झाले असुन रु.131.37 लक्ष इतके अनुदान खर्च केलेले आहे. सदर अहवाल पूर्णत्वाच्या मंजुरीसाठी सादर करीत आहोत. सदर योजनेअंतर्गत सर्व घटकांचे काम आर्थिक व भौतिक दृष्टया पूर्ण केलेले आहे शासनाकडुन मंजुर झालेल्या घटक प्रकल्पापैकी सर्व घटक प्रकल्प पूर्ण झालेले आहेत.

तरी विटा शहरासाठी लहान व मध्यम शहराची एकात्मीक शहर विकास योजनेचा (IDSMT) पुर्णत्वाचा दाखला मिळणेकामी शासनाकडे प्रस्ताव सादर करणेस मंजूरी देत आहे.

सही/-
( डॉ.विक्रम बांदल )
प्रशासक
विटा नगरपरिषद विटा

दिनांक 13/03/2024 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र.296

विषय – विटा नगरपरिषद आस्थापना विभागाकडील पे रोल सॉफ्टवेअर साठी वार्षिक देखभाल दुरूस्ती करणेकामी मंजूरी देणेबाबत निर्णय घेणे.

संदर्भ- मा.मुख्याधिकारी यांनी संगणक अभियंता यांची दिनांक 13/03/2024 रोजी मंजूर केलेली टिपणी.

विटा नगरपरिषद आस्थापना विभागात कर्मचारी पगार काढणे, भत्ते काढणे, महागाई भत्ता काढणे इत्यादी कामकाजाकरीता पेरोल सॉफ्टवेअर 2018 साली खरेदी करणेत आले होते. परंतू सध्या सदर सॉफ्टवेअर मध्ये वारंवार समस्या येत आहेत. त्यामुळे सन 2019 पासून सदर सॉफ्टवेअर अपडेट करणे गरजेचे आहे. जेणे करून सदर विभागास दैनंदिन कामकाज करणेस अडचणीचे होणार नाही. तरी सदर कामी सॉफ्टवेअर अपडेट करणे अत्यावश्यक आहे.

तरी विटा नगपरिषद आस्थापना विभागाकडील पेरोल सॉफ्टवेअरसाठी वार्षिक देखभाल दुरूस्ती करणेकामी मंजूरी देत आहे. सदरचा होणारा खर्च नगपरिषद फंडातून करणेत यावा. याकामी पुढील आवश्यक ती नियमबध्द कार्यवाही करणेत यावी.

सही/-
( डॉ.विक्रम बांदल )
प्रशासक
विटा नगरपरिषद विटा